९) रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी आलेल्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या अन्य तारणावर.

ब) मुदत ठेवीच्या तारणापोटी बिगर सभासदास कर्ज/उचल करणे.

क) रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार नाममात्र सभासदांना कर्ज मंजूर करणे.

ड) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व निबंधक यांनी वेळोवेळी ठरविलेल्या नियमानुसार संचालक मंडळाने कर्ज मंजूरीबाबत, योग्य तो दुरावा, विनातारण कर्जाचे प्रमाण, कर्जाच्या अटी व नियम (कारणानुसार व तारणानुसार) योग्य ते धोरण व नियम ठरविणे आवश्यक आहे.

इ) संचालक मंडळ सभा/कर्ज उपसमिती सभा यांना कर्ज अर्जातील अटी व शर्तीनुसार ते मंजूर करण्याचे अधिकार असतील अथवा कुठलेही कारण न देता सदर कर्ज अर्ज नामंजूर करण्याचे अधिकार असतील. संचालक मंडळ सदस्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच अन्य अधिकृत केलेले अधिकारी यांनी कर्ज अर्जावर दिलेल्या शेऱ्यानुसार कर्ज मंजूरीबाबत किंवा नामंजूरीबाबत योग्य तो निर्णय घेता येईल.

फ) सर्व प्रकारची कर्जे देतांना रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे पालन होईल हे पाहणे आवश्यक आहे.

**५४) बँकींग व्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा -**

अ) संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या संबधीत संस्था व फर्मला कोणत्याही प्रकारची देणगी किंवा जाहिरात देता येणार नाही.

ब) बँक त्रयस्थ संस्थांना प्रायोजक म्हणून जाहिरात देऊ शकणार नाही.

क) कोणत्याही सामाजिक कार्यासाठी खर्च करत असतांना बँक सामाजिक बांधिलकीचा निधी उभारुन त्याबाबतचे स्वतंत्र नियम तयार करुन खर्च करु शकेल.

ड) मागील वर्षाच्या जाहीर निव्वळ नफ्याच्या १% पर्यंतचाच खर्च हा देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी करता येतील.

**५५) नफ्याची वाटणी :**

सहकारी संस्था कायदा व नियम यास अनुसरुन बँकेचा निव्वळ नफा काढला जाईल व त्कयाची वाटणी केली जाईल.

१) संचालक मंडळाचे शिफारशीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल.

अ) सहकारी संस्था कायद्याचे तरतूदीनुसार २५% पेक्षा कमी नाही इतका नफा वैधानिक राखीव निधीत जमा केला जाईल.